I.O
करिता

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
**प्रथम खबर अहवाल**
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S.(ठाणे):** सदर बाजार **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0015 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/01/2021 04:33 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 07/01/2021
**Date To ( दिनांक पर्यंत):** 08/01/2021
**Time From (वेळेपासून):** 14:14 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:30 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 09/01/2021 **Time (वेळ):** 03:30 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 005 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/01/2021 04:33 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** सातरस्ता चौकात,दर्बी कलेक्शन,सोलापूर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** राजू चंद्रकांत टिळेकर

**(b) Father's Name (वडील चे नाव) :** चंद्रकांत

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 484,आदित्य नगर,सोलापूर,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 484,आदित्य नगर,सोलापूर,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-9168888883**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गणपतसिंग मोहनसिंग चव्हाण | | वडील का नाम : मोहनसिंग | 1. अरविंद धाम , पोलीस वसाहत सोसायटी,सोलापूर ,सदर बाज़ार, सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | धीरजकुमार पांडूरंग शिवशरण | | वडील का नाम : पांडूरंग | 1. आंबेडकर नगर, तालुका पोलीस स्टेशन, सोलापूर,सदर बाज़ार,सोलापुर शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दि. 09.01.2021 मी राजू चंद्रकांत टिळेकर, वय - 38 वर्षे, व्यवसाय - सोयाचिप्स खरेदी विक्री रा. घर न 484, आदित्य नगर, सोलापूर मो.नं. 9168888883 / 9665399759 समक्ष फिर्यादी जबाब देतो की, मी सोया चिप्सची खरेदी व विक्री करून कुंटूंबाचा उदरनिर्वाह करतो. अंदाजे 1 महिन्यापूर्वी माझा मित्र विजय कदम यांचेवर मटक्याची रेड सदर बझार पोलीसांनी केली होती. त्या रेड नंतर 2 ते 3 वेळा सदर बझार पो.ठाण्याचे पोलीस चव्हाण यांनी माझे मोबाईलवर फोन करून, मला पोलीस ठाण्यात बोलावले, परंतु माझा सदर रेडशी संबंध नसल्याने मी पोलीस ठाण्यात गेलो नाही. दि. 4/1/2021 रोजी मी विजापूर नाका येथे असताना, मला रात्री 8-9 वाजेदरम्यान सदर बझार पो.ठाण्याचे पोलीस चव्हाण साहेब यांनी सदर बझार पो.स्टेशनला नेऊन मध्यरात्री 1 वाजेपर्यंत बसवून ठेवले. मध्यरात्री पोलीस चव्हाण साहेब यांनी माझा ओप्पो कंपनीचा मोबाईल फोन काढून घेतला. माझी पुर्ण झडती घेतली व मला म्हणाले कि, विजय कदम यांचे विरुध्द मटक्याच्या दाखल गुन्हयात तुला आरोपी करणार आहे. तुला आरोपी व्हायच नसल्यास दोन रुपयाचे पेन दयावे लागतील, असे सांगितले. मी कसले पेन विचारले असता, त्यांनी मला 1 रुपयाचा पेन म्हणजे 1 लाख रुपये, 2 रुपयाचे पेन म्हणजे 2 लाख रुपये असा हिशोब असल्याचे सांगितले. त्यानंतर मी पोलीस चव्हाण साहेब यांना विनंती केली असता, त्यांनी 2 लाख रुपये म्हणजेच 2 रुपयाचे पेन, गुरुवारी दिनांक 07.01.2021 रोजी संध्याकाळी 5 वाजेपर्यंत देण्याचे बोलीवर मला तेथून घरी पाठविले. माझा ओप्पो कंपनीचा मोबाईल फोनही त्यांनी ठेवून घेतला होता.माझा व विजय कदम यांचे विरुध्द मटक्याच्या दाखल गुन्हयाचा काहीएक संबंध नाही. मला पोलीस चव्हाण साहेब यांना लाच देण्याची अजिबात इच्छा नसल्याने त्यांचेवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कारवाई करण्याचे ठरवले. त्यासाठी मी दिनांक 06.01.2021 रोजी समक्ष लाप्रवि, सोलापूरच्या कार्यालयात येवून श्री. जगदीश भोपळे, पोलीस निरीक्षक, ऍन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर यांच्या समक्ष लेखी तक्रार नोंदवली. सदर तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्यासाठी पोनि भोपळे यांनी श्री. विजयकुमार अंजीखाने व श्री. अ.कय्युम. बागवान यांना सोलापूर महानगरपालिका येथून पंच म्हणून उपलब्ध करून घेवून त्यांची पंच म्हणून काम करण्यासाठी संमती घेण्यात आली. सदर पंचाची आपसात ओळख करून घेतल्यानतर पोनि भोपळे यांच्या सुचनेनुसार मी पुन्हा पंचांसमक्ष माझी तक्रार सविस्तर कथन केली. तसेच पोनि भोपळे यांनी मी त्यांच्याकडे दिलेली लेखी तक्रार दोन्ही पंचांना दाखवली. त्यावर दोन्ही पंचांनी व पोनि भोपळे यांनी सह्या केल्या. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी मी पंचासह पोलीस चव्हाण यांची समक्ष भेट घेवून लाच मागणीच्या तक्रारीची पडताळणी करण्याचे



Scanned with CamScanner

ठरवले. त्यासाठी पोनि भोपळे यांनी मला व पंच नं.1 बागवान यांना पडताळणी बाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मला व पंचांना व्हईस रेकर्डर व नवीन मेमरी कार्ड दाखवून त्याचा वापर व उपयोग समजावून सांगितला. त्यानंतर नवीन मेमरी कार्ड व्हईस रेकर्डरमध्ये टाकून ते ऑन करून माझ्या गळ्यात शर्टाचे आतील बाजूस अडकवून माझेकडील होंडा कंपनीची ईवन चारचाकी क्र. एम.एच.13 बी.एन.0755 वरुन सदर बझार पोलीस चौकीकडे रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच नं 1 बागवान असे दोघेजन माझेकडील चारचाकी वाहनातून सदर बझार पोलीस चौकी व सदर बझार पोलीस स्टेशन येथे गेलो असता, तेथे पोलीस चव्हाण हे मिळून आले नाहीत. त्यानंतर मी तेथून पोलीस चव्हाण यांचा मोबाईल नंबर घेऊन ऍन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात परत आलो. तेथे पोनि भोपळे यांनी माझ्या गळ्यातील व्हईस रेकडर काढून घेवून तो बंद करून पंच 1 बागवान व मला हकीकत विचारून घेतली. त्यावेळी आम्ही घडलेली हकिकत सांगितली. त्यानंतर पोनि भोपळे यांचे सुचनेवरुन मी माझ्याकडील पत्नीचा मोबाईल क्रमांक 9665399759 वरुन पोलीस चव्हाण यांचा मोबाईल क्रमांक 8329861021 हा डायल केला. मोबाईलचा स्पीकर फोन ऑन केला परंतु पोलीस चव्हाण यांचा मोबाईल क्रमाक स्वीच ऑफ लागला. त्यानंतर पोनि भोपळे यांनी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी दिनांक 07.01.2021 रोजी करावयाचे ठरविले. दिनांक 07.01.2021 रोजी मी घरी असताना माझ्या पत्नीच्या मोबाईलवरुन पोलीस चव्हाण यांचा मोबाईल क्रमांक 8329861021 वर फोन लावून विचारणा केली असता त्यांनी मला भेटायला बोलावले. त्यानंतर तात्काळ मी ऍन्टी करप्शन ब्युरो सोलापूर कार्यालयात आलो. तेथे पोनि भोपळे व पंचाना मी पोलीस चव्हाण यांना फोन केलेबाबत सांगितले. त्यानंतर पोनि भोपळे यांनी मला व पंच नं.1 बागवान यांना पडताळणी बाबतच्या सुचना देऊन व्हाईसरेकर्डर सह पोलीस चव्हाण यांची भेट घेण्यास पाठवून दिले. त्यानंतर मी व पंच बागवान असे सदर बझार पोलीस चौकी समोर गेलो, तेथे फोनवरुन पोलीस चव्हाण यांचेशी संपर्क केला असता त्यांनी सिव्हील हस्पीटल येथे बोलावले. तेथून फोनवरुन मला जगंदबा चौक येथे बोलावले. जगदंबा चोक येथे मी व पंच बागवान असे गेलो असता तेथे पोलीस चव्हाण हे मोटारसायकल वरुन आले. त्यांचे पाठीमागे कुणीतरी बसले होते. त्यांचे पाठोपाठ एक मोटारसायकल आली. त्या मोटारसायकलवर मला पोलीस चव्हाण यांनी बसायला सांगितले. त्यानंतर मला त्यांनी जगंदबा चौकातून गाडीवरुन सात रस्ता चौकाच्या अलीकडील हुमामा मेडिकल जवळ थांबवले. तेथे पोलीस चव्हाण यांनी मला थोडेसे बाजूला घेऊन चर्चा करत करत मी पोलीस चव्हाण यांना म्हणालो कि,आपला टाईम आहे आजुन आपल्याला म्हणुन मला फक्त फोन दया म्हणजे मला आरेंज करायला बरं. दोन लाख आरेंज करायला म्हणजे चेष्टा नाय त्यावर पोलीस चव्हाण हे माझा हात जोरात दाबून म्हणाले कि, पैशाच नाय वो पैसे आयच्या पुच्चीत जावु द्या पैशाला काय त्यानंतर इतर चर्चा करुन मी पोलीस चव्हाण यांना म्हणालो कि, मला मोबाईल पाहिजे ओ तुमच्या कामासाठीच मोबाईल पाहिजे ना त्यावर पोलीस चव्हाण म्हणाले कि, हे आसं आसं काम नाय करायचे त्यावर मी म्हणालो कि, आ ओ त्यावर पोलीस चव्हाण म्हणाले कि, कुठली केस करायला दोन माणसं पाहीजेत त्यावर मी म्हणालो कि, हा. नाय केस बीस काय करु नका तुमच सगळ काम करतो त्यावर पोलीस चव्हाण म्हणाले कि, केसत नाय मला केस करावी लागतय हे काम झाल का मला सांग त्यावर मी म्हणालो कि, ते होतय गी काम त्यानंतर इतर चर्चा करुन मी पोलीस चव्हाण यांना मोबाईल मागितला. त्यादरम्यान मला पोलीस चव्हाण यांनी दोन रुपयाचे पेन म्हणजेच दोन लाख रुपये मागितले. मी संध्याकाळी पाच ते सहा वाजेदरम्यान पैसे देण्याचे कबूल करुन माझा मोबाईल त्यांचेकडून घेतला. त्यानंतर मला त्यांनी परत जगदंबा चौका जवळ सोडले. तेथे मी पंच बागवान यांना घेऊन ऍन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात परत आलो. तेथे पोनि भोपळे यांनी माझ्या गळ्यातील व्हईस रेकडर काढून घेवून तो बंद करून पंच 1 बागवान व मला हकीकत विचारून घेतली. त्यावेळी आम्ही घडलेली हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही सर्वांनी व्हईस रेकर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यामध्ये माझ्यावर कारवाई न करण्यासाठी पोलीस चव्हाण यांनी 2 रुपयाचे पेन म्हणजेच 2 लाख रुपये मागितले असल्याचे पडताळणी मध्ये स्पष्ट झाले. त्यानंतर माझ्या जवळ फक्त 40,000/- रुपये असल्याने पोनि भोपळे यांचे सुचनेवरुन मी पंचासमक्ष पोलीस चव्हाण यांना फोन लावला असता त्यांनी फोन उचलला नाही त्यानंतर लगेचच पोलीस चव्हाण यांचा मला फोन आला मी त्यांना 40,000/- रुपये जमा झालेबाबत कळविले असता, त्यांनी पुन्हा 40,000/- रुपये नको, 2 रुपयाचे पेन पाहिजे असे म्हणाले. त्यानंतर सदरची रक्कम दिनांक 08.01.2021 रोजी दुपारी देण्याचे ठरले. दिनांक 08.01.2021 रोजी मी लाच रक्कम जमवित असताना मला पोलीस चव्हाण यांचा दुपारी 3 वेळा फोन आले व मला 2 रुपयाचे पेन घेऊन बोलावले. मी ऍडजस्ट करित आहे असे त्यांना सांगितले. त्यानंतर मला रक्कम ऍडजस्ट न झालेने एकूण 50,000/- रुपये घेऊन मी लाप्रवि कार्यालयात दुपारी 4 वाजेदरम्यान आलो. तेथे पोनि भोपळे यांना मी पोलीस चव्हाण यांना देण्यासाठी माझ्याकडे असलेले 50,000/- रूपये हजर केले. त्यात 2000/- रुपये दराच्या 16 नोटा व 500/- रूपये दराच्या 36 नोटा होत्या. पोनि भोपळे यांनी 50,000/- रुपया सोबत 2000/- रुपयांच्या नोटेच्या आकाराचे 75 कोरे कागद देण्याचे ठरविले. सदर हजर केलेल्या नोटांचे क्रमांक सापळापूर्व पंचनाम्यात नमूद करून. त्या नोटांना व 75 कोरे कागदांना ऍथ्रासीन पावडर लावण्याचा, त्याचे प्रात्यक्षीक करण्याचा व सापळा कारवाईमध्ये करावयाच्या कामाच्या सुचनांचा सविस्तर सापळापूर्व पंचनामा करण्यात आला. त्यानंतर पोलीस चव्हाण यांचेवर सदर बझार पोलीस चौकी येथे लाचेचा सापळा लावण्याचे ठरवले. त्यासाठी पुन्हा व्हईस रेकर्डरचे रेकर्डींग सुरु करून माझ्या गळ्यात आडकवण्यात आला. मी, व पंच क्रं.1 बागवान असे माझ्याकडील मोटार सायकल वरून व उर्वरीत सापळा पथक मोटार सायकलवरून सदर बझार पोलीस चौकी येथे आलो. परंतू पोलीस चव्हाण तेथे नव्हते, तेथून मी माझ्या मोबाईलवरून पोलीस चव्हाण यांच्याशी 2 वेळा संपर्क केला. परंतू त्यांनी फोन उचलला नाही त्यानंतर मी व पंच नं.1 बागवान असे ऍन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात परत आलो. त्यानंतर आम्ही सर्वजन ऍन्टी करप्शन ब्युरोच्या कार्यालयात पोलीस चव्हाण यांच्या मोबाईल कलची प्रतिक्षा करीत थांबलो. त्यादरम्यान पोलीस चव्हाण यांचा 8329861021 या मोबाईल क्रमांकावरून मला कल आला, मी म्हणालो, 2 पेनाची तयारी झाली आहे. त्यावर पोलीस चव्हाण यांनी सात रस्ता येथे या असे सांगितले. त्यानंतर पोलीस चव्हाण यांचेवर सात रस्ता येथे लाचेचा सापळा लावण्याचे ठरवले. त्यासाठी पुन्हा व्हईस रेकर्डरचे रेकर्डीग सुरू करून माझ्या गळ्यात आडकवण्यात आला. मी, व पंच क्रं.1 बागवान असे माझ्याकडील मोटार सायकल वरून व उर्वरीत सापळा पथक मोटार सायकलवरून सात रस्ता येथे आलो. त्यानंतर मी पोलीस चव्हाण यांना संपर्क साधून सात रस्ता येथे आलो आहे असे सांगितले. त्यानंतर त्यांनी मला फोनवरुन संपर्क साधून बिग बझार समोर बोलावले. तेथे गेल्यावर मला त्यांनी हाताचा इशारा करुन त्यांचेकडे बोलावले तेथे मला पोलीस चव्हाण म्हणाले कि, बसा ओळखीचे आलेत..गाडी असु दे तिथं पाच मिनीटं..गाडी असु दे तिथं गाडीला काय होत नाही बसा बसा वो त्यावरुन मी म्हणालो कि, नाही नाही डीक्कीत आहे पेमेंट त्यावर पोलीस चव्हाण मला म्हणाले कि, बरं बरं.. सिंगल या गाडी घेवून त्यावरुन मी गाडी घेऊन त्यांचेसोबत निघालो. पोलीस चव्हाण एका मोटारसायकलवर होते. त्यांचेसोबत होन्डा स्कूटर वर एक अनोळखी व्यक्ती होता. पोलीस चव्हाण यांनी मला हाताच्या इशा-याने त्यांचे पाठीमागे येण्यास सांगितले. मी त्यांच्या पाठीमागे सात रस्ता येथून एम्लाईमेंट चौकाकडे जाणा-या रोडवरुन दर्बी कलेक्शनकडे जाणा-या रोडवर त्यांच्या पाठीमागे गेलो, दर्बी कलेक्शनच्या अलिकडून उजव्या बाजूला वळून सीटी हस्पीटलकडे जाणा-या रोडच्या कडेला अंधारात त्या दोघांनी गाडी थांबवली. त्यांचे पाठोपाठ मीही गाडी थांबवली, तेथे मला पोलीस चव्हाण यांनी त्यांचा उजव्या हाताचा अंगठा उजव्या तर्जनीवर घासून त्यांच्या सोबत आलेल्या अनोळखी व्यक्तीकडे पैसे देण्याचा इशारा केला. त्यानंतर पोलीस चव्हाण हे मोटारसायकलवरुन निघून गेले. त्यानंतर पोलीस चव्हाण यांचे सोबत आलेल्या व्यक्तीने त्यांचे बोट तोंडावर ठेवून, मला गप्प राहण्याचा इशारा केला. त्यानंतर त्या व्यक्तीने त्यांचा उजव्या हाताचा अंगठा उजव्या तर्जनीवर घासून लाचेची मागणी केली असता, मी माझ्या मोटारसायकलच्या डिकीतून पैसे काढून त्यांचे समोर धरले असता त्यांनी ती रक्कम



Scanned with CamScanner

उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हाताने हाताळताना मी केलेल्या पूर्वनियोजित इशा-यावरुन सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी त्या इसमाला रंगेहात पकडले. त्या इसमाला पोनि भोपळे यांनी नाव, गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव धीरजकुमार पांडूरंग शिवशरण वय 34 वर्षे, धंदा चायनीज गाढा, रा. घर नं. 425, आंबेडकर नगर, तालुका पो

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** KAMLAKAR VASANTRAO PATIL(I (Inspector)) / POBN67115 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** KAMLAKAR VASANTRAO PATIL
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN67115

HC/2A7
पोलिस ठाणे अमंलदार
सदर बझार पोलिस स्टेशन
सोलापूर शहर



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**

Scanned with CamScanner